# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २०१ वा ❑ भारतीय सौर दिनांक ८ आश्विन शके १९४८, बुधवार दि.३० सप्टेंबर २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## कृत्रिम बुद्धिमत्ता आणि चेहऱ्याचे भाडेतत्त्व

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

मानवी संस्कृती आणि तंत्रज्ञानाचा विकास जसजसा पुढे जात आहे, तसतसे उपजीविकेचे आणि अर्थार्जनाचे मार्गही अत्यंत वेगाने बदलत आहेत. पूर्वीच्या काळी शेतजमीन, राहते घर, दुकाने किंवा एखादे वाहन भाडेतत्त्वावर देऊन त्यातून अर्थार्जन करण्याची पद्धत समाजाच्या परिचयाची होती. परंतु, संगणकीय तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या एका अत्यंत प्रगत आणि काहीशा अवाढव्य क्रांतीने आता थेट माणसाचा चेहरा आणि स्वतःची ओळख भाड्याने देण्याची एक अजब, पण आर्थिकदृष्ट्या अत्यंत फायदेशीर संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. सध्याच्या गतिमान युगात तरुणांसाठी पैसे कमवण्याचा हा एक विनासायास आणि घसघशीत आर्थिक उत्पन्न देणारा नवा पर्याय म्हणून उदयास आला आहे. जगातील अनेक आघाडीचे तसेच आता देशांतर्गत पातळीवर कार्यरत असणारे विविध आभासी आशय निर्मिती करणारे मंच तरुणांना त्यांचा चेहरा व्यावसायिक वापरासाठी देण्याच्या बदल्यात लाखो रुपयांचे मानधन देऊ लागले आहेत. यातून एक संपूर्णपणे नवी अर्थव्यवस्था आकाराला येत असून, ती सविस्तरपणे समजून घेणे हे आजच्या काळाची मोठी गरज बनली आहे.

ही संपूर्ण संकल्पना आणि त्यामागील तांत्रिक प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची मात्र अचूक आहे. जाहिरात क्षेत्र, विविध संस्थांची व्यावसायिक सादरीकरणे, बातम्यांचे कार्यक्रम आणि समाजमाध्यमांवरील विविध प्रकारच्या प्रचारात्मक चित्रफितींमध्ये मानवी चेहऱ्यांची मोठी गरज भासते. ही वाढती गरज पूर्ण करण्यासाठी तंत्रज्ञान कंपन्या सामान्य पण आकर्षक चेहऱ्याच्या तरुणांचा शोध घेतात. अत्यंत उच्च क्षमतेच्या आणि सूक्ष्म हालचाली टिपणाऱ्या छायाचित्रण यंत्रांच्या माध्यमातून या निवडक तरुणांच्या चेहऱ्यांचे त्रिमितीय संगणकीय मोजमाप केले जाते. या प्रक्रियेत त्यांच्या चेहऱ्यावरील अत्यंत सूक्ष्म हावभाव, हसण्याची विशिष्ट पद्धत, डोळ्यांची व भुवयांची हालचाल आणि आवाजाची ठेवण टिपून एक हुबेहूब आभासी मानवी अवतार तयार केला जातो. एकदा का हा अवतार संगणकीय प्रणालीत कायमस्वरूपी जतन झाला, की संबंधित व्यक्तीला पुन्हा कधीही प्रत्यक्ष चित्रीकरणासाठी उभे राहण्याची गरज उरत नाही. निर्मिती करणारी संस्था केवळ त्यांच्या प्रणालीमध्ये लिखित संवाद पुरवते आणि तो कृत्रिम अवतार अगदी खऱ्याखुऱ्या माणसासारखे नैसर्गिक हावभाव करत ते संवाद जगातील कोणत्याही भाषेत लीलया बोलू लागतो.

विशेष म्हणजे, ही संकल्पना केवळ भविष्यातील एखादा कल्पनाविलास नसून, आजच्या घडीला ती एक प्रत्यक्ष वास्तवात आलेली मोठी औद्योगिक उलाढाल आहे. सध्या जागतिक पातळीवर सिंथेसिया, अवर वन आणि हेजेन यांसारख्या अनेक कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील नामवंत कंपन्या या कार्यपद्धतीवर प्रत्यक्ष काम करत आहेत. या कंपन्या सामान्य माणसांचे, अभिनेत्यांचे किंवा मॉडेल्सचे चेहरे स्कॅन करून त्यांचे अधिकृत आभासी अवतार तयार करतात. यासाठी संबंधित व्यक्तींसोबत रीतसर कायदेशीर करार करून त्यांना शेकडो ते हजारो डॉलर्सपर्यंतचे एकरकमी मानधन दिले जाते, किंवा त्यांच्या चेहऱ्याचा वापर करून जेवढ्या व्यावसायिक चित्रफिती बनवल्या जातील त्या आधारावर स्वामित्व धन (रॉयल्टी) दिले जाते.

या तंत्रज्ञानाचे वास्तव आणि गांभीर्य किती मोठे आहे, हे गेल्या वर्षी झालेल्या हॉलीवूडमधील लेखक आणि कलाकारांच्या अभूतपूर्व संपावरून जगासमोर आले. चित्रपट निर्माते कलाकारांचा चेहरा एकदाच स्कॅन करून तो भविष्यात कायमस्वरूपी वापरतील आणि त्यामुळे आपला हक्काचा रोजगार हिरावला जाईल, अशी रास्त भीती हॉलीवूडमधील कलाकारांनी व्यक्त केली होती. या ऐतिहासिक संपामुळे तंत्रज्ञान विश्वातील या नव्या अर्थकारणाची सत्यता ठळकपणे अधोरेखित झाली. याच प्रवाहामुळे आता केवळ व्यावसायिक अभिनेतेच नव्हे, तर सामान्य तरुणही याकडे घरबसल्या मिळणाऱ्या उत्पन्नाचे एक आधुनिक साधन म्हणून पाहत आहेत.

या नव्या आणि वेगवान अर्थकारणाने आजच्या तरुणाईला मोठी भुरळ घातली आहे. महाविद्यालयात जाणारे विद्यार्थी आणि फावल्या वेळेत कोणतेही शारीरिक कष्ट न करता अतिरिक्त उत्पन्न मिळवू पाहणारे अनेक तरुण–तरुणी या नव्या प्रवाहाकडे अत्यंत आशेने आकर्षित होत आहेत. केवळ आपला चेहरा काही तासांसाठी संगणकीय जगाच्या हवाली करून मिळणाऱ्या या हजारो–लाखो रुपयांच्या मोबदल्यामुळे रोजगाराचा हा एक अत्यंत आकर्षक मार्ग बनला आहे. दुसरीकडे, यातून निर्मिती करणाऱ्या कंपन्यांचाही कोट्यवधी रुपयांचा फायदा होत आहे. एखादी जाहिरात तयार करण्यासाठी प्रत्यक्ष अभिनेत्याला बोलावणे, चित्रीकरणाचा भव्य देखावा उभारणे, प्रकाशयोजना आणि प्रवासावर होणारा लाखो रुपयांचा अवाढव्य खर्च कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे एका झटक्यात वाचतो. हा संगणकीय आभासी अवतार न थकता, कोणत्याही सुट्टीची, विश्रांतीची किंवा वेतनवाढीची मागणी न करता चोवीस तास अविरत काम करू शकतो, ज्यामुळे वेळेची आणि पैशांची मोठी बचत होते.

मात्र, ही नवी संकल्पना वरवर पाहता अत्यंत सोपी आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर वाटत असली, तरी तिच्या गर्भात अनेक गंभीर, नैतिक आणि दूरगामी धोके दडलेले आहेत. आपला चेहरा नेमक्या कोणत्या उत्पादनाच्या जाहिरातीसाठी किंवा कशा प्रकारच्या आक्षेपार्ह आशयासाठी वापरला जाईल, यावर एकदा करार झाल्यानंतर संबंधित तरुणांचे कोणतेही थेट नियंत्रण राहात नाही. एखाद्या वादग्रस्त विषयावर आपले मत नसतानाही आपला चेहरा ते मत मांडत असल्याचे पाहावे लागणे, ही बाब मानसिकदृष्ट्या अत्यंत क्लेशदायक ठरू शकते. भविष्यात तंत्रज्ञानाच्या गैरवापरातून बनवलेले खोटे संगणकीय चित्रण आणि ओळखीची चोरी यांसारख्या अत्यंत गंभीर सायबर गुन्ह्यांमध्ये स्वतःचा चेहरा वापरला जाण्याची शक्यता अजिबात नाकारता येत नाही. कृत्रिम बुद्धिमत्तेने मानवाच्या प्रगतीचे एक नवे दालन नक्कीच उघडले आहे, परंतु पैशांच्या तात्पुरत्या मोहात पडून आपली ओळख कायमस्वरूपी संगणकीय जगाच्या हवाली करण्यापूर्वी करारातील बारीक–सारीक कायदेशीर अटी आणि भविष्यातील सामाजिक धोके ओळखूनच तरुणांनी या प्रवाहात पाऊल टाकणे शहाणपणाचे ठरेल. तंत्रज्ञानाचा वेग कितीही प्रचंड असला, तरी वैयक्तिक माहितीची सुरक्षा आणि कायदेशीर सजगता हीच या नव्या युगातील माणसाची सर्वात मोठी ढाल आहे.

# धनशेट्टी, शिंदे, सारडा, कुर्बान हुसेनी । कुर्बान कर दी जान हिंदुस्था पे अपनी ।।

**ज्योतिर्मय साहित्य**

मल्लाप्पा रेवणसिध्दप्पा धनशेट्टी हे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतीकारक स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांचे नाव भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे. त्यांनी आणि त्यांच्या तीन साथीदारांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन सोलापूर शहराला हुतात्म्यांचे शहर हा गौरवशाली किताब मिळवून दिला. मल्लाप्पा धनशेट्टी यांना साथ देणारे हे तीन साथीदार म्हणजे कुर्बान हुसेन, जगन्नाथ शिंदे आणि श्रीनिवास लक्ष्मीनारायण सारडा. १२ जानेवारी १९३१ रोजी येरवडा तुरुंगात फासावर चढलेले हे चार वीर आजही प्रत्येक भारतीयाच्या मनात देशभक्तीची ज्योत तेवत ठेवतात. त्यांचे बलीदान हे केवळ इतिहासाच्या पानांपुरते मर्यादित नसून, ते आजच्या पिढीलाही कर्तव्यनिष्ठा, त्याग आणि राष्ट्रप्रेम यांची शिकवण देणारे आहे. त्यांच्या फाशीनंतर....

धनशेट्टी, शिंदे, सारडा, कुर्बान हुसेनी ।

कुर्बान कर दी जान हिंदुस्था पे अपनी ।।

या दोन चरणांत या चौघांनी काय केले याचा संदेश सर्व हिंदुस्थानात गेला. फाशी दिले तेंव्हा कुर्बान हुसेन २० वर्षे, जगन्नाथ शिंदे २४ वर्षे, मल्लप्पा धनशेट्टी ३२ वर्षे तर श्रीनिवास कासट ३६ वर्षांचे होते. १२ जानेवारी १९३१ हा दिवस सोलापूरच्या आणि संपूर्ण भारताच्या इतिहासात एक काळाकुट्ट परंतू तितकाच अभिमानास्पद दिवस म्हणून नोंदवला गेला. मृत्यूला सामोरे जाताना या चौघांनीही तिळमात्र भिती दाखवली नाही. उलट, ''वंदे मातरम'' आणि ''भारत माता की जय'' अशा घोषणा देत हसतमुखाने त्यांनी फाशीचा दोर स्वीकारला. त्यांच्या या धैर्याने संपूर्ण देशाला हादरवून सोडले आणि त्याचबरोबर स्वातंत्र्यलढ्याला नवी




प्रेरणाही दिली. लोकमान्य टिळक यांच्या केसरी या वृत्तपत्राने सोलापूरच्या या हुतात्म्यांच्या बलीदानाची दखल घेत ब्रिटिश सरकारच्या अन्यायकारक धोरणांवर टीका केली. संपूर्ण हिंदुस्थानात या घटनेने असंतोषाची एक नवी लाट निर्माण होऊन सविनय कायदेभंगाच्या चळवळीला अधिक बळ मिळाले.

महात्मा गांधी यांच्या १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीने देशव्यापी क्रांतीकारी चळवळ व्यापली होती. ४ मे १९३० रोजी महात्मा गांधीजींना कराडी छावणीत घुसून पकडण्यात आले आणि त्यांची रवानगी येरवडा जेल मध्ये करण्यात आली होती. ५ मे रोजी ही बातमी प्रसिद्ध झाल्यावर सोलापूर शहरात सभा–निदर्शने सुरु झाली. ८ मे १९३० रोजी जमनालाल बजाज आणि नरीमन यांच्या अटकेची बातमी सोलापुरात समजली. युवक संघाने महामिरवणूक काढली. मिरवणुकीत मल्लप्पा रेवणसिद्धी धनशेट्टी यांचा नेतृत्वासह सहभाग होता. मिरवणूकीची व्यवस्था केल्यानंतर तुळजापूर वेशीकडे गडबडीमधुन अत्यंत बिकट परिस्थितीत ७–८ हजारांचा जमाव आपल्या नेतृत्व कौशल्याने मल्लाप्पा यांनी फक्त एक लाठी हाती घेऊन पांगवीत कलेक्टर नाईट आणि डीएसपी प्लेफेअर यांना वाचविले. परंतु कलेक्टर यांनी मार्शल कायदा लागू करून बेछूट गोळीबार ८ मे १९३० रोजी केला. या गोळीबारात अनेक निष्पाप नागरीक जखमी झाले आणि काहींचा मृत्यूही झाला. या अमानुष कृत्यामुळे जनतेचा संयम सुटला आणि परिस्थिती हाताबाहेर गेली. संतप्त जमावाने पोलीस ठाण्यांवर हल्ले केले. सरकारी इमारतींना आग लावली आणि काही पोलिसांचा जमावाकडून मृत्यू झाला. ब्रिटिश शासनाने लष्कर बोलाविले. ९, १०, ११ मे १९३० या तीन दिवशी सोलापूर मुक्त होते. सोलापूरला ब्रिटिश अंमल नव्हता. या तीन दिवसांत सोलापूर शहरांवरील ब्रिटिश प्रशासनाचे नियम पूर्णपणे कोलमडले. शहरातील जनतेने स्वतःच शहराचा कारभार आपल्या हाती घेतला.




नगरपालिकेच्या इमारतीवर तिरंगा फडकावण्यात आला आणि काही काळासाठी सोलापूर शहर हे स्वतंत्र भारताचे एक प्रतिक बनले. संपूर्ण ब्रिटिश साम्राज्यात, स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीच स्वातंत्र्याचा अनुभव घेणारे सोलापूर हे एकमेव शहर ठरले, अशी इतिहासात नोंद आहे. मात्र हे स्वातंत्र्य फार काळ टिकले नाही. ब्रिटिश शासनाने बोलविलेले लष्कर सोलापूरात पोहोचले. मोठ्या प्रमाणातील सैन्याने सोलापूर शहरावर पुन्हा ताबा मिळविला. लष्करी कायदा लागू झाल्यानंतर ब्रिटिश प्रशासनाने ८ मे १९३० रोजी झालेल्या गोळीबारानंतर संतप्त जमावाने केलेल्या कृत्यांसाठी, विशेषतः पोलीसांच्या हत्येसाठी मल्लप्पा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे, श्रीनिवास सारडा, कुर्बान हुसेन यांना जबाबदार धरण्यात आले. विशेषतः मंगळवार पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या दोन पोलिसांच्या हत्येच्या आरोपाखाली या चौघांना अटक करण्यात आली. स्वातंत्र्यलढ्यातील धनशेट्टी, शिंदे, सारडा आणि हुसेन हे निष्ठावान कार्यकर्ते परंतु ब्रिटिश सरकारला जनतेमध्ये दहशत निर्माण करायची होती आणि भविष्यात अशा प्रकारची बंडखोरी पुन्हा होऊ नये यासाठी कठोर उदाहरण घालून द्यावयाचे होते. अटकेनंतर मल्लप्पा धनशेट्टी व इतर तिघांचा अतोनात छळ करण्यात आला तसेच त्यांच्यावर अमानुष अत्याचार करण्यात आला.

शारीरिक व मानसिक यातना देत चौघांच्यावरही खटला भरण्यात आला. मल्लप्पा धनशेट्टी व इतर तिघांनीही आपल्या धैर्याला व निर्धाराला कुठेही डळमळू दिले नाही. आपल्यावर झालेल्या अन्यायाबद्दल कधीही तक्रार केली नाही. मनोधैर्य न गमावता चेह–यावरील निश्चयी भाव आणि भारताच्या स्वातंत्र्यासाठी बलीदान देण्याची या चारही जणांची तयारी बघून ब्रिटिश अधिकारीही अचंबित झाले.

(क्रमशः)









## जात्यावरच्या ओव्या......

बैलपोळ्याचा सण
ऋषिबाबाला मागण
ठेव सुखाचे देवा
भावासंग गायधन ||८६४||

बैलपोळ्याचा सण
साज कवड्याचा
दिसतो दुरुन शोभुन
माथा खिल्लार बैलाचा ||८६५||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७६

ज्योतिर्मय साहित्य

**करी काम नि:काम या राघवाचे ।**
**करी रूप स्वरूप सर्वा जिवांचे ।**
**करी छंद निर्द्वंद्व हे गूण गाता ।**
**हरिकीर्तनी वृत्तिविश्वास होता ।।७७।।**

अर्थ : या राघवाच्या प्राप्तीची मनापासून कामना कर. सकल प्राणिमात्रांच्या ठायी असलेले त्याचे रूप स्वत:मध्येही पहा. त्याचे गुणगान करण्याचा छंद लागला की सारे भेद, द्वंद्व नाहिसे होतील.

( नि:काम -निष्काम होऊन/ निरिच्छ वृत्तीने, निर्द्वंद्व - सुखदुःखाच्या पलीकडे जाणे /द्वैतभाव नष्ट होणे, हरिकीर्तन - परमेश्वराचे गुणगान करणे )

विवेचन : परमेश्वर प्राप्तीची इच्छा असणाऱ्या साधकाने कसे वागावे ते समर्थ या श्लोकामध्ये आपल्याला सांगतात. आपण सामान्य प्रापंचिक माणसे आहोत. आपल्या मनात निरनिराळ्या इच्छा, वासना वेळोवेळी उद्भवत असतात. जोपर्यंत वासना आहेत, तोपर्यंत परमेश्वर प्राप्ती होणार नाही. आपण परमेश्वराची प्रार्थना, ध्यान करतो ते सुद्धा मनात काहीतरी इच्छा ठेवूनच. त्यामुळे एक वेळ आपल्या त्या कामना पूर्ण होतील पण ईश्वर मात्र आपल्यापासून दूरच राहील. म्हणून इतर सर्व वासनांचा त्याग करून मला अन्य काही नको. फक्त परमेश्वर हवा आहे अशा अनन्य भावनेतून जर आपण त्याचे गुणगान केले तर त्याचा एक परिणाम असा होईल की हळूहळू आपल्या इतर वासना नाहीशा व्हायला लागतील. देहबुद्धी कमी होईल.






त्या गोष्टीचे मात्र आपल्याला सतत ध्यान लागले पाहिजे. त्याचा छंद किंवा वेड लागले पाहिजे. असे झाले म्हणजे आपल्या अंतर्यामी असणारा ईश्वर हळूहळू या विश्वात सर्वत्र विद्यमान आहे याची जाणीव होईल. तो जसा माझ्यात आहे तसाच सर्व प्राणीमात्रात देखील आहे याची जाणीव दृढ होत जाईल. तो केवळ सजीवात नसून निर्जीवात किंवा सृष्टीच्या कणाकणात त्याचे अस्तित्व आहे हे जाणवेल. भक्त प्रल्हादाचे उदाहरण आपल्याला माहिती आहे. प्रल्हादाचा पिता हिरण्यकश्यपू देवांना आपला शत्रू समजत होता. पण अशा या असुराचा मुलगा प्रल्हाद मात्र विष्णूचा भक्त होता. जेव्हा हिरण्यकश्यपूने त्याला विचारले,'' कुठे आहे तुझा ईश्वर ?'' तेव्हा त्याने सांगितले की तो या सर्व चराचरात भरून राहिला आहे. मग हिरण्यकश्यपूने विचारले की या निर्जीव अशा खांबात देखील तो आहे का ? तेव्हा प्रल्हादाने होय उत्तर दिले. नंतर त्याच स्तंभातून परमेश्वराने नरसिंह रूप धारण करून दुराचारी अशा हिरण्यकश्यपूचा वध केला.

**(क्रमशः)**



ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏

## || संजय उवाच... ||

@संजय काव्या पुणे 7743918559



✍️नम्रता
विद्या विनयेन शोभते
"नम्रतेमुळेच विद्या (ज्ञान) शोभून दिसते" कितीही उच्चशिक्षित, ज्ञानी किंवा हुशार असला, तरी त्या व्यक्तीच्या स्वभावात नम्रता किंवा विनयशीलता नसेल, तर त्या ज्ञानाला काहीच अर्थ उरत नाही. नम्रतेमुळे ज्ञानाचे तेज अधिक वाढते.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

## नामाचे सूक्ष्म स्वरूप



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

ज्योतिर्मय साहित्य

नुसते 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य 'नोकरी नोकरी' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. 'रामनाम' आणि 'नोकरी' यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. 'राम राम' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वत:च्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा 'राम राम' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ' राम राम ' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे 'नोकरी नोकरी' असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण 'राम राम' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. 'राम राम' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा 'नोकरी नोकरी' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच 'राम राम' म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता' राम राम' जपावे.

मनाच्या सर्व दु:खाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकच: प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. 'मी' पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुःखाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.

***

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

### आपले सण आपले उत्सव
### पितृपक्ष

देवतांच्या संतूष्टी साठी त्यांचे पूजन, अर्चन, यज्ञयाग करणे गरजेचे असते. तर पितरांच्या संतूष्टी साठी श्राद्ध, तर्पण करणे गरजेचे असते.

मनुष्याचा मृत्यू झाला म्हणजे दहा दिवसांमध्ये त्याचे श्राद्ध करावे असा नियम आहे. याशिवाय दर महिन्याला ही त्या तिथीला श्राद्ध करावे. असे पहिले वर्ष निदान करावे, असा नियम आहे. यानंतर दरवर्षी मृत्यूच्या तिथीला मुलांनी ,नातवांनी श्राद्ध करावे असा दंडक शास्त्राने घालून दिला आहे.

*गरुड पुराण*

गरुड पुराणात श्राद्ध विधीचे महत्त्व, त्याचा यथा सांग विधी, त्याचे नियम, त्याप्रसंगी पात्र व अपात्र लोकांची यादी, हे सविस्तर दिले आहे.

या पुराणात भगवंताचे वाहन गरुड, एकदा भगवंताला विचारतात की, माणसाचा मृत्यू पश्च्यात सपिंडीकरण होते व त्यानंतर वार्षिक श्राद्ध करण्यात येते. यानंतर मृत व्यक्ती स्व कर्मानुसार देवत्व, मनुष्यत्व, अथवा पशु,पक्षित्व प्राप्त करतो. या सर्वांचे भिन्न भिन्न आहार असतात. ते वेगवेगळ्या लोकात वास्तव्य करतात. या पितृ लोकांसाठी केल्या गेलेल्या श्राद्धाचा अन्न भाग त्यांना कसा प्राप्त होतो? ब्राह्मण भोजनाने व होम केल्याने त्यांची संतुष्टी कशी होते? आपल्या बऱ्या वाईट कारणामुळे प्राप्त योनीत आलेला प्राणी, आपल्या वंशजांनी केलेल्या श्राद्धाचे अन्न कसे प्राप्त करून घेतो? (क्रमश:)

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### तरूणांनो, जास्त डिजीटल पेक्षा फिजिकल व्हा.

मित्रांनो, आज सर्वत्र चर्चिला जाणारा विषय आहे आजचा तरूणवर्ग, जेनझी आणि ए.आय.तर गेल्या 25 वर्षात डिजीटल क्रांतीने सर्व क्षेत्र बदलून गेली आहे.कामधंदा नौकरी वेळा, आणि एआयचा किंवा रोबोटचा झपाट्याने तर माणसाच्या बौध्दिक, शारीरिक क्षमतेवरच परिणाम करत आहे असे वाटते. अर्थात असेच होईल असे नाही फक्त ही आपली चर्चा. पण असे वाटण्याचे कारण मागील पिढीतिल लोकांना हे बदल नविन आहे. सर्व जण गूगल, डिजिटल व एआयची दोस्त झाली आहेत!त्याला जोड तंत्रज्ञान, विज्ञान, मशीन यांची साथ मिळत गेल्याने शारीरिक, मानसिक व फिजिकल जणू आपल्यात नाहीच असे वाटते! पुर्वी ध्येयाने झपाटलेल तरूण मन व त्याची जिद्द दिसत असे. ही जिद्द कधी पुस्तक पानातून, तर कधी अन्याय अत्याचारातून, कधी जखमेतून तर कधी आई-बापाच्या कष्टातून, हातातून ऊपाशी डोळ्यात तर कधी अपयश अडचणीतून घडत असे. म्हणून जुन्या पिढीत अनेकांचे जीवन साधना होते. त्याच्या जीवनाला घामाचा वास होता.पण आताच्या जमान्यात मन, विचार, कर्तृत्व, त्याग, प्रतिभा हे जणू सर्व बाहेरच राहते. बघा पटते का? अजून सोपं.. जेव्हा एखादा तरूण आपल्या हातातील वेळेला फक्त करमणुकीत किंवा मशीनमधे वा गूगल ए.आय पेक्षा पुस्तक, विचार कला, समाज आणि स्वप्ना-साठी खर्च करतो तेंव्हाच 'भविष्याची पहिली पायरी तयार होते. नुसती ऑर्डर कमान्डने नाही.. कारण तारूण्य हा केवळ शरिराचा ऋतू नाही तर तो निर्मितीच ऋतू आहे. यात कोणते बी पेरायचे यावरच आयुष्याची बाग ठरत असते. आज एवढं पुरे गुड डे व्हेरी गूड़ मार्निंग आणि ईथे थांबतो आपण वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा सुप्रभात.



## गुणकारी आलं (अद्रक )

ज्योतिर्मय साहित्य

आल्याचा वापर करून शरीरातील युरीक ॲसिड करू शकता कमी, जाणून घ्या सेवनाची पद्धत

आजकाल शरीरात यूरिक ॲसिड वाढणं ही एक कॉमन समस्या झाली आहे. खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी आणि चुकीची लाइफस्टाईल यामुळे अनेकांना ही समस्या होते. जेव्हा शरीरात यूरिक ॲसिड वाढतं तेव्हा सांधे, जॉईंट्समध्ये वेदना आणि सूज अशा समस्या होतात. जर वेळीच यावर उपचार केले नाही तर ही समस्या आणखी वाढू शकते. यूरिक ॲसिड कंट्रोल करण्यासाठी तुम्ही काही घरगुती उपायही करू शकता. जवळपास सगळ्याच किचनमध्ये मिळणारी एक गोष्टी ही समस्या दूर करू शकते. ही गोष्ट म्हणजे आलं.

यूरिक ॲसिड कमी करतं आलं

आल्याच्या चहापासून ते वेगवेगळ्या पदार्थांमध्ये समावेश केला जातो. याने पदार्थांची टेस्ट तर वाढतेच सोबच यात अनेक औषधी गुणही असतात. यातील अँटी-इन्फ्लेमेटरी आणि अँटी-ऑक्सिडेंट ने शरीरातील सूज कमी होते. तसेच आल्याने पचनक्रियाही चांगली होते. शरीरातील विषारी पदार्थ सुद्धा बाहेर निघण्यास मदत मिळते.

आलं कसं करतं काम?

आल्यामध्ये जिंजरोल्स नावाचं एक शक्तीशाली तत्व असतं, जे शरीरात यूरिक ॲसिड जमा होण्यापासून रोखतं. हे तत्व यूरिक ॲसिडचे क्रिस्टल बनण्याची प्रक्रिया हळूवार करतं. ज्यामुळे जॉईंट्समध्ये वेदना आणि सूज कमी होते. तसेच याच्या मदतीने शरीरात रक्तप्रवाह सुद्धा सुरळीत होतो. इतकंच नाही तर शरीरातील विषारी पदार्थ सुद्धा बाहेर निघतात.

आल्याचं सेवन करण्याची योग्य पद्धत

आल्याचं सेवन वेगवेगळ्या प्रकारे तुम्ही करू शकता. मात्र, याचा योग्य पद्धतीने वापर करणं गरजेचं आहे. तेच जाणून घेऊया...

आल्याचा चहा

आल्याचा चहा यूरिक ॲसिड कमी करण्यासाठी एक बेस्ट उपाय आहे. यासाठी ताज्या आल्याचे छोटे-छोटे तुकडे करा आणि ते पाण्यात उकडून घ्या. तुम्हाला हवं तर तुम्ही यात थोडं मध आणि लिंबाचा रसही टाकू शकता. याच चहाचं दिवसातून दोन वेळा सेवन करा.

आलं आणि हळदीचं मिश्रण

आलं आणि हळद दोन्हींमध्ये अँटी इन्फ्लेमेटरी गुण भरपूर असतात. या दोन्हींचं मिश्रण करून एक पेस्ट बवा आणि ही पेस्ट कोमट पाण्यात टाकून सेवन करा. याने यूरिक ॲसिड कमी करण्यास मदत मिळते.

आल्याचा रस

ताज्या आल्याचा थोडा रस काढून त्यात थोडा लिंबाचा रस टाका. हा रस सकाळी रिकाम्या पोटी सेवन करा. याने शरीर आतून डिटॉक्स होईल आणि यूरिक ॲसिडही कंट्रोल होईल.

आल्याचं तेल

आल्याचा तेलाचा सुद्धा तुम्हाला जॉईट्समधील सूज आणि वेदना कमी करण्यास करू शकता. या तेलाने जॉईंट्सवर हलक्या हाताने मालिश करा. याने ब्लड सर्कुलेशन चांगलं होतं आणि वेदनाही कमी होतात.

काय काळजी घ्या?

आल्याचं जास्त सेवन केल्याने पोटात जळजळ होऊ शकते. त्यामुळे याचं सेवन कमी प्रमाणात करा.

जर तुम्हाला आरोग्यासंबंधी एखादी गंभीर समस्या असेल तर आल्याचं सेवन करण्याआधी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

****

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

## प्रभातपुष्प

### षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे (काव्यसंध्या)
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

**जय गणपती देवा**

मोदक की लाडू
आवडतो तुज खरा
जय गणपती देवा
जास्वंद फूल लाल
सोबती दुर्वा हिरवी
मनोभावे घडो सेवा

शुभ कार्याचा आहेस
तुच खरा दाता
जय गणपती देवा
पूजा करता मिळे
सुख,समाधान जीवनी
आवडे मोदकांचा मेवा

# पुरुषाला कधीच न समजणारे बायकोशास्त्र

**ज्योतिर्मय साहित्य**

जुन्या काळी दूरदर्शनवर 'तू तू, मैं मैं' नावाची एक छान हिंदी मालिका होती. नवरा-बायकोच्या संसारातील छोटी-छोटी भांडणे, कुरबुरी, गैरसमज आणि त्यातून निर्माण होणारे विनोद हे सगळे अगदी घराघरात घडते तसेच वाटायचे. त्यामुळे ती मालिका पाहताना आपल्याच घरात डोकावून पाहत असल्यासारखी मजा यायची.

तेव्हा ती मालिका पाहताना मला खूप गंमत वाटायची. पण लग्न झाल्यावर हळूहळू जाणवायला लागले की, अरेच्चा! ही मालिका फक्त दूरदर्शनवरच नाही, तर आपल्या घरातही सुरू झाली आहे.



आमचा काही प्रेमविवाह नाही. दोन्ही घरातील वरिष्ठ मंडळींनी योग्य वेळ साधून जुळवून आणलेला हा योग. लग्नाच्या सुरुवातीला नवीन नवीन संसार असल्यामुळे दोघेही जरा जपूनच वागायचो.

मी काही बोललो, काही मागितले की लगेच काम व्हायचे. टिपॉयवरचा पाण्याचा ग्लास चुकून माझ्याकडून पडला, तर ती शांतपणे उठून पाणी पुसून घ्यायची. एखादी छोटी चूक झाली तरी काही कुरकुर नाही.

मला वाटले, वा! आपल्याला तर अगदी शांत स्वभावाची बायको मिळाली!

पण माझा हा निष्कर्ष जरा घाईचा होता, हे पुढच्या काही वर्षांत समजले.

संसाराच्या सुरुवातीला मी बोलायचो आणि ती ऐकायची.

नंतर काही वर्षांनी दोघेही एकमेकांना बोलायला लागलो.

आणि आता माझ्या सेवानिवृत्तीनंतर तर परिस्थिती अशी आहे की,

ती बोलते.

मी ऐकतो

ती पुन्हा बोलते

मी पुन्हा ऐकतो

कधी कधी मला वाटते, घरात माझे काम म्हणजे 'श्रोता' हे पद आयुष्यभरासाठी कायम झाले आहे.

तुमचं कसं आहे ?माहीत नाही, पण माझ्या बाबतीत तरी हा अनुभव आता आयुष्यभर घेण्याची मानसिक तयारी केली आहे. कारण संसारात काही गोष्टींना पर्याय नसतो.

आता कालचीच घटना घ्या.

तिच्या हातून किचनच्या ओट्यावर चुकून मीठ सांडले. मी सहज म्हणालो,

''काय हे? एवढं मीठ सांडलं.''

त्यावर ती लगेच म्हणाली,

''अहो, तुम्हाला काय माहिती आहे? ओटा धुताना मीठ वापरलं की जंतू राहत नाहीत आणि घरात नकारात्मकताही येत नाही.

✍©®
गिरीश खं. वसेकर
नांदेड सिटी, सिंहगड रोड,
पुणे ९४२२६५९४००



मी काही बोललो नाही.

कारण माझ्याकडून कधी चुकून मीठ सांडले तर...

''काय हो! जरा सावकाश घेत जा ना. सगळी मेली घाईच असते तुमची.

आता यावर नवऱ्याने काय उत्तर द्यायचे?

संसारात सत्य महत्त्वाचे नसते,

तर कोणाकडून चूक झाली आहे हे महत्त्वाचे असते.

भाजीचा तर स्वतंत्रच इतिहास आहे.

मी माझ्या बायकोला कधी म्हणालो,

''आज पालकाची भाजी कर.''

तर ती मेथीची भाजी करते.

कधी म्हणालो,

''आज मेथी कर.''

तर अगदी खात्रीने पालकाची भाजी करणारच.

एकदा तर मी स्वतःला खूप शहाणा समजून एक प्रयोग केला.

मला खरं तर पालक हवा होता. पण अनुभवातून शहाणा झाल्यामुळे मी मुद्दाम म्हणालो,

''आज मेथी कर.''

मला वाटले, आता नक्की पालकाची भाजी मिळेल.

पण त्या दिवशी तिने मेथीचीच भाजी केली!

म्हणजे बायकोला गोंधळवण्याच्या नादात मीच गोंधळलो.

तेव्हा लक्षात आले की बायकोशी संसार करताना मानसशास्त्र, तर्कशास्त्र, गणितशास्त्र यापेक्षा 'बायकोशास्त्र' अधिक महत्त्वाचे आहे.

घरातील वस्तूंचीही स्वतःची जागा असते.

एकदा घरात एखादी वस्तू शोधत होतो. पाच मिनिटे शोधूनही सापडेना. शेवटी बायकोला विचारले,

(क्रमशः)

# शौर्य स्पोर्ट्स अकॅडमी १० खेळाडूची राज्यस्तरीय तायक्कांडो स्पर्धे साठी निवड



**ज्योतिर्मय साहित्य**

पहूर ता जामनेर (गोकुळसिंग राजपूत)- क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीडा परिषद पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नाशिक व नाशिक जिल्हा तायक्कांडो स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागीय शालेय तायक्कांडो क्रीडा स्पर्धा विभागीय क्रीडा संकुल नाशिक येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या.

पहूर येथिल शौर्य स्पोर्ट्स अकॅडमी च्या तायक्कांडो खेळांडूनी झालेल्या शालेय विभागीय तायक्कांडो स्पर्धेत १० सुवर्ण, २ रौप्य व १ कांस्य पदक प्राप्त करून, सुवर्ण पदक प्राप्त खेळाडूची ७ आक्टो. अकोला येथे होणाऱ्या राज्यस्तरीय तायक्कांडो स्पर्धे साठी निवड झाली.

सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय पहूर कसबे

१ )मोहिनी हरिभाऊ राऊत प्रथम क्रमांक २) दिपाली गणेश भिवसणे प्रथम क्रमांक ३)भावेश अण्णासाहेब निकम प्रथम क्रमांक ४) कार्तिक रमेश सोनवणे प्रथम क्रमांक ५)स्वाती रवींद्र चौधरी प्रथम क्रमांक ६) निलेश संजय मालकर प्रथम क्रमांक ७ ) पल्लवी गणेश गायकवाड सहभाग

इंदिराबाई ललवाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जामनेर पुरा१ ) माहेश्वरी संजय धनगर प्रथम क्रमांक

आ.ग.र. गरुड माध्यमिक विद्यालय शेंदूर्णी १ ) केविन रविंद्र चौधरी प्रथम क्रमांक २ ) कामिनी विश्वनाथ नाथ प्रथम क्रमांक ३ ) ओम दिपक शेळके प्रथम क्रमांक

सरस्वती विद्या मंदिर शेंदूर्णी १) आर्यन शांताराम वानखेडे द्वितीय क्रमांक २) कार्तिकी पंकज चौधरी द्वितीय क्रमांक

आर एल ललवाणी माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय शेंदूर्णी १) आयान आसिफ पिंजारी तृतीय क्रमांक

सदर खेळाडूना सावित्रीबाई फुले विद्यालयाचे क्रीडा शिक्षक तथा शौर्य स्पोर्ट्स अकॅडमी चे सचिव तायक्कांडो प्रशिक्षक हरीभाऊ राऊत, राष्ट्रीय पंच ईश्वर क्षिरसागर ,भूषण मगरे लोचना चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले

या यशा बद्दल खेळाडूना जळगाव जिल्हा तायक्कांडो स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष गोपाल जोनवाल सचिव राजेंद्र जंजाळे सहसचिव श्रीकृष्ण चौधरी संचालक सुनिल मोरे शौर्य स्पोर्ट्स ॲकडमी चे अध्यक्ष अरविंद देशमुख उपाध्यक्ष बाबुराव आण्णा घोंगडे संचालक ॲड संजय पाटील सर्व संचालक सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय च्या मुख्याध्यापिका वैशाली घोंगडे सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी खेळाडू व पालक यांनी अभिनंदन केले.

# पॉवर हीटर प्रा. लि. येथे एमआयटीच्या विद्युत अभियांत्रिकी विद्यार्थ्यांची औद्योगिक भेट

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - एमआयटी पॉलिटेक्निक, छत्रपती संभाजीनगरच्या विद्युत अभियांत्रिकी विभागातील द्वितीय वर्षातील ४५ विद्यार्थ्यांनी दिनांक २६ सप्टेंबर २०२६ रोजी पॉवर हीटर प्रा. लि., छत्रपती संभाजीनगर येथे औद्योगिक भेट दिली.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना औद्योगिक हीटिंग एलिमेंट्स व सिस्टिम्स, तापमान मापन व नियंत्रण तसेच औद्योगिक भट्ट्या व ओव्हन्स याबाबत प्रत्यक्ष औद्योगिक माहिती व मार्गदर्शन मिळाले.



विद्यार्थ्यांनी उत्पादन प्रक्रिया, उपकरणांची कार्यपद्धती आणि औद्योगिक कार्यसंस्कृती यांचा जवळून अभ्यास केला.

या वेळी विद्युत विभागप्रमुख प्रा.सौ.व्ही.पी. ठाकरे व प्रा. बी.आर. जाधव यांनी विद्यार्थ्यांसोबत सहभाग घेतला. श्रीमती शारदा तेली यांनी विद्यार्थ्यांना उद्योगातील विविध प्रक्रिया व तांत्रिक बाबींची माहिती दिली.

या औद्योगिक भेटीचे आयोजन प्रा. एस.एस. पवार यांनी केले. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील तांत्रिक संकल्पनांचा प्रत्यक्ष औद्योगिक प्रक्रियांशी संबंध समजून घेण्यास उपयुक्त अनुभव मिळाला.




सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

## विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



### स्वप्न मोठं ठेवा, सुरुवात छोटी करा...

काही स्वप्नं डोळे उघडे असतानाही पाहिली जातात.

आईला स्वतःचं घर द्यायचं असतं...

वडिलांच्या कष्टांना विश्रांती द्यायची असते...

मुलांना चांगलं आयुष्य द्यायचं असतं...

किंवा परिस्थितीने आखलेल्या चौकटीबाहेर जाऊन स्वतःची ओळख निर्माण करायची असते.

पण स्वप्न मोठं असतं आणि हातात साधनं कमी असतात.

मग मन म्हणतं—

"माझ्याकडून हे कसं होणार?"

आणि याच एका प्रश्नामुळे कितीतरी स्वप्नं मनातच मरून जातात.

पण खरं तर स्वप्न पूर्ण करण्यासाठी सुरुवातीलाच सगळं मिळालेलं असण्याची गरज नसते.

फक्त पहिलं पाऊल टाकण्याची हिंमत लागते.

आपण सुरुवात करण्यासाठी मोठ्या संधीची वाट पाहतो; पण मोठ्या संधी अनेकदा छोट्या सुरुवातीमधूनच जन्म घेतात.

आपल्या स्वप्नांचा आकार आपल्या आजच्या परिस्थितीवर ठरू देऊ नका.

आज तुमच्याकडे मोठं भांडवल नसेल, तर ज्ञान मिळवा.

मोठी ओळख नसेल, तर प्रामाणिकपणे काम करा.

अनुभव नसेल, तर छोट्या संधी स्वीकारा.

वेळ कमी असेल, तर रोज थोडा वेळ स्वतःच्या स्वप्नासाठी राखून ठेवा.

सुरुवात छोटी असणं ही कमजोरी नाही. ती शिकण्याची, चुका सुधारण्याची आणि स्वतःला घडवण्याची संधी आहे.

मोठं स्वप्न पाहणं महत्त्वाचं आहे; पण त्या स्वप्नासाठी आज काय केलं, हा प्रश्न त्याहून महत्त्वाचा आहे.

कदाचित तुमचं पहिलं पाऊल कुणाला दिसणारही नाही. त्यावर टाळ्या वाजणार नाहीत. लगेच कौतुक मिळणार नाही.

तरीही ते पाऊल टाका.

कारण आजची छोटी बचत उद्याचं घर उभं करू शकते. आजचा एक तास उद्याचं कौशल्य घडवू शकतो. आजचा एक प्रामाणिक प्रयत्न उद्याच्या मोठ्या संधीचं दार उघडूशकतो.

आणि लक्षात ठेवा— (क्रमश:)

## ॥ श्री गणेश चिंतन ॥



*समर्थ रामदास स्वामी कृपेने मनाचे श्लोक व दासबोधाच्या आधाराने "गणेश उत्सवात १० दिवस नियमित एक गणेश चिंतन करू या कारण "जो स्वतः शुभ झाला तोच शुभारंभ करू शकतो"*

कृतज्ञ मी कृतार्थ मी, भगवंत हृदयस्थ आहे 🙏 अपर्णा परांजपे कात्रज पुणे

गणेशापासून शारदेपर्यंत : वाणीच्या अंतरंगातून परब्रह्माकडे

"गणाधीश" → "मुळारंभ" → "निर्गुण" → "शारदा" → "चत्वार वाचा" → "राघव"

म्हणजे समर्थांची वाटचाल अशी आहे: गणेश → बुद्धी → वाणी → ज्ञान → निर्गुण → राम.

"गणेश → शारदा → चत्वार वाचा → परब्रह्म → राघव".

मूळ दासबोध पाहिल्यावर हा संबंध केवळ आपला तात्त्विक अंदाज नाही; गणेशस्तवनानंतर लगेच शारदास्तवन आणि त्यानंतर सद्गुरुस्तवन असा समर्थांनीच क्रम ठेवला आहे.

आपण प्रथम मनाच्या श्लोकातील ती अद्भुत ओळ पुन्हा घेऊया—

गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा ।
मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ॥
नमूं शारदा मूळ चत्वार वाचा ।
गमूं पंथ आनंत या राघवाचा ॥१॥

आता प्रश्न असा—गणेशानंतर लगेच शारदेला नमस्कार का?

याचे उत्तर दासबोधाच्या तिसऱ्या समासात विलक्षण रीतीने मिळते.

१. गणेश : बोधाची सुरुवात

दासबोधातील गणेशस्तवनाची पहिली ओवी —

ॐ नमोजि गणनायेका । सर्व सिद्धिफळदायेका ।
अज्ञानभ्रांतिछेदका । बोधरूपा ॥१॥

म्हणजे साधनेचा आरंभ— अज्ञान → भ्रांतीचा छेद → बोध.

आणि गणेशस्तवनाच्या शेवटी समर्थ स्पष्ट सांगतात

वांछ्या धरूनि चित्तीं । परमार्थाची ॥३०॥

म्हणून गणेश हा परमार्थाचा आरंभबिंदू ठरतो.

२. मग शारदा कोण? गणेशस्तवन संपले.समर्थ लगेच म्हणतात—

आतां वंदीन वेदमाता । श्रीशारदा ब्रह्मसुता ।
शब्दमूल वाग्देवता । माहं माया ॥१॥

आणि लगेच—

जे उठवी शब्दांकुर । वदे वैखरी अपार ।
जे शब्दाचें अभ्यांतर । उकलून दावी ॥२॥

ही दुसरी ओवी आपल्या आजच्या चिंतनासाठी विशेष आहे.

"शब्दाचें अभ्यांतर उकलून दावी"शब्द बाहेर ऐकू येतो.

पण त्याच्या आत अर्थ आहे. अर्थाच्या आत तत्त्व आहे. आणि तत्त्वाच्या अनुभूतीत बोध आहे.



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'आई-मुलगी' (बिंब आणि प्रतिबिंब)

तिची मुलगी एअर होस्टेस असते; पण तरीही त्या आईला तिच्या लग्नाची आणि भवितव्याची सतत काळजी लागून राहिलेली असते. त्यावर पुलं मिश्कीलपणे पण तितक्याच भावूकतेने म्हणतात —"पुण्यातली शांताबाई असो की लंडनमधली जेन... आई ती आईच!"

सासरी गेलेल्या मुलीचे जगातील सर्वात हळवे ठिकाण म्हणजे तिची आई! सासरी काही खुट्ट झाले, तरी ओठांवर सहज शब्द येतो—'आई गं!' खरं तर आता ती स्वतःही एका मुलाची आई झालेली असते; पण आपल्या आईसाठी तिचे मन कायम लहान मूल होऊन माहेरच्या वाटेने धाव घेत असते.

अक्षयतृतीयेला ग्रामीण भागात 'आखाजी' म्हणतात. आखाजी आणि दिवाळी या सणांना लेकीला माहेरची अनिवार ओढ लागते.

'साधी माणसं' या चित्रपटातील अजरामर गीतात म्हटल्याप्रमाणे—"धावत माहेरच्या वाटेनं मन जातं..." ही तीच अनावर ओढ असते.

आई आणि लेक या एकमेकींच्या सर्वात चांगल्या मैत्रिणी असतात. आईने लेकीजवळ मन हलके करावे आणि माहेरी आलेल्या लेकीने साऱ्या सुख-दुःखाचा पाढा आईच्या मांडीवर डोके ठेवून वाचावा; इतकी पारदर्शकता जगात इतर कुठल्याच नात्यात नसते. हे नाते रेशमासारखे मुलायम असले, तरी त्याची वीण अभेद्य असते. माहेरावरून सासरी परत जाताना लेक खूप काही सोबत घेऊन जाते; ती समृद्ध आठवणी, मायेची शिदोरी आणि तृप्ती घेऊन जाते. तिच्या चेहऱ्यावर ते समाधान इतके विलक्षण उमटते, की तिला जणू 'मूठभर मांस' चढते! (क्रमश:)

# ‘‘पितरांना श्रद्धा द्या, ते शक्ती देतील....’’

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

‘श्राद्ध’ हा शब्दच ‘श्रद्धा’ या भावनेशी संबंधित आहे.

आपण आपल्या पूर्वजांविषयी मनात कृतज्ञता, आदर आणि प्रेम ठेवून त्याचे विधीपूर्वक प्रकटीकरण करतो, त्याला श्राद्ध म्हणता येते.

४. पितृसंपर्क आणि त्यातून मिळणारे लाभ

अदृश्य सहाय्य

पितर आपल्या सूक्ष्म शक्तीद्वारे आपल्या आत्मीयांना संकटातून मार्ग काढण्यास, योग्य दिशा मिळविण्यास आणि अडचणींवर मात करण्यास साहाय्य करू शकतात.

प्रगतीचे मार्गदर्शक

ज्यांचे अंतःकरण शुद्ध आहे आणि ज्यांची भावभूमी सात्त्विक आहे, त्यांना अशा सूक्ष्म सत्तांशी संपर्कातून मानसिक प्रेरणा, उत्साह आणि आत्मबल मिळू शकते, असे येथे सांगितले आहे.

५. अंधश्रद्धा आणि यथार्थ

पितरांविषयी भीती बाळगणे किंवा त्यांना भूत-प्रेत समजणे योग्य नाही.दृश्य जगाप्रमाणेच चेतनेच्या क्षेत्रातही दृश्य आणि अदृश्य स्तरांमध्ये परस्पर संबंध असू शकतो, अशी या पुस्तकाची संकल्पना आहे.जसा स्थूल जगातील प्रत्येक घटक परस्परावलंबी आहे, त्याचप्रमाणे चेतनेच्या जगातही दृश्य आणि सूक्ष्म सत्तांमध्ये परस्पर आदान-प्रदान असते, असा विचार येथे मांडला आहे.

‘‘पितरांना खरी श्रद्धा दिली जाईल, त्यांना तृप्त ठेवले जाईल, तर ते निश्चयाने शक्ती, प्रकाश, मार्गदर्शन, प्रेरणा, सहकार्य आणि भावात्मक अनुदान देतील.’’

या विचाराचा केंद्रबिंदू असा आहे की पितरांना केवळ बाह्य वस्तू अर्पण करण्यापेक्षा मनातील श्रद्धा, कृतज्ञता आणि पवित्र भावना अधिक महत्त्वाच्या आहेत.

‘‘श्रद्धेपासून ‘श्राद्ध’ हा शब्द बनला आहे.’’

श्रद्धेने केलेले कार्य म्हणजे श्राद्ध.

ज्या जड-चेतन घटकांपासून आपल्याला लाभ मिळतो, त्यांच्याविषयी आपल्या मनात उपकारबुद्धी असावी आणि ती कृतज्ञता कोणत्या ना कोणत्या रूपाने व्यक्त करावीहीच श्राद्धामागची व्यापक भावना आहे.

या अर्थाने श्राद्ध केवळ एका दिवसाचा कर्मकांडात्मक विधी न राहता कृतज्ञतेचे जीवनमूल्य बनते.

‘‘पितर वस्तुतः देवतांपासून भिन्न, परंतु सामान्य मनुष्यांपेक्षा उच्च श्रेणीच्या श्रेष्ठ आत्मा आहेत.’’

या विचारातून पितरांविषयी भीती न ठेवता श्रद्धा, प्रेम आणि कृतज्ञता ठेवण्याचा संदेश दिला आहे.

प्राचीन श्लोक

‘‘दह्यमानस्य प्रेतस्य
स्वजनैर्यैर्जलाञ्जलिः।
दीयते प्रीतिरूपोऽसौ प्रेतो याति
यमालयम्।।’’




या श्लोकाच्या माध्यमातून दिवंगत व्यक्तीस स्वजनांनी भावपूर्ण जलांजली अर्पण करण्यामागील भावार्थ स्पष्ट केला आहे.

जलांजली ही केवळ जल अर्पण करण्याची क्रिया नसून, त्यामागे प्रेम, स्मरण, श्रद्धा आणि दिवंगत व्यक्तीच्या पुढील गतीसाठी मंगलकामना हा भाव आहे.

‘‘दृश्यमान अनेकता आपल्या मूळात अविच्छिन्न एकता धारण करून आहे.’’ही ओळ अत्यंत गहन तात्त्विक विचार व्यक्त करते.




आपल्याला विश्वात असंख्य भेद दिसतातजीव-जगत, स्थूल-सूक्ष्म, दृश्य-अदृश्य; परंतु या अनेकतेच्या मुळाशी एक अखंड तत्त्व आहे, अशी भारतीय अध्यात्माची दृष्टी आहे.

१. कृतज्ञता हे जीवनमूल्य

आपल्याला जीवन, संस्कार, प्रेम आणि आधार देणाऱ्या माता-पिता, पूर्वज आणि आप्तेष्टांविषयी कृतज्ञता ठेवणे ही महत्त्वाची शिकवण आहे.उपकाराची जाणीव ठेवणारा मनुष्य अधिक नम्र आणि समृद्ध बनतो.

२. श्राद्धाचा भावार्थ समजून घेणे

श्राद्ध म्हणजे भीतीपोटी केलेला विधी नव्हे.

तो आहे

स्मरण + श्रद्धा + कृतज्ञता + प्रेम + सद्भावना.

परंपरेमागील हा भाव समजून घेतल्यास कर्मकांडालाही अंतर्मुख करणारे आध्यात्मिक स्वरूप प्राप्त होते.

३. मृत्यू म्हणजे जीवनाचा पूर्ण अंत नव्हे

मृत्यू हा स्थूल शरीराचा अंत आहे; चेतनेचा अंत नाही.

हा विचार स्वीकारल्यास मृत्यूकडे केवळ भयाच्या दृष्टीने न पाहता जीवन अधिक सजग, जबाबदार आणि सदाचारी पद्धतीने जगण्याची प्रेरणा मिळू शकते.

४. दृश्य आणि अदृश्य जगाचा संबंध

आपल्या इंद्रियांना जे दिसते तेवढेच अस्तित्व नाही, अशी भारतीय अध्यात्माची व्यापक दृष्टी आहे.

स्थूल जगाच्या पलीकडे सूक्ष्म जगताची संकल्पना भारतीय परंपरेत आढळते. मन, संस्कार, विचार आणि चेतना यांचा जीवनावर होणारा परिणामही या संदर्भात विचारात घेतला जातो.

५. भय नव्हेश्रद्धा

पितरांच्या नावाने भीती निर्माण करणे किंवा अंधश्रद्धा वाढविणे हा या विचाराचा उद्देश नाही.

त्याऐवजी‘‘आपल्या पूर्वजांचे स्मरण करा, त्यांच्या चांगल्या संस्कारांचे अनुकरण करा आणि कृतज्ञतेने जीवन जगा.’’

हा या संपूर्ण विचाराचा अधिक व्यावहारिक संदेश मानता येतो.

अंतिम संदेश

फक्त ‘‘पितरांना काय अर्पण करावे?’’ हा प्रश्न नाही तर त्याहून खोल प्रश्न असा आहे‘‘ज्यांच्यामुळे आपण आज आहोत, त्यांच्याविषयी आपल्या मनात किती कृतज्ञता आहे?’’

श्राद्ध म्हणजे केवळ तर्पणातील जल नव्हे;ते स्मरणातील प्रेम आहे.

श्राद्ध म्हणजे केवळ पिंड नव्हे;

ते पूर्वजांच्या संस्कारांप्रती कृतज्ञता आहे.

श्राद्ध म्हणजे केवळ एक दिवसाचा विधी नव्हे;

ते कृतज्ञतेने जगण्याची वृत्ती आहे.

आणि पितृपक्षाचा सर्वांत सुंदर अर्थ कदाचित असा -पूर्वजांना स्मरा, त्यांच्या चांगल्या संस्कारांना आपल्या जीवनात जागे करा आणि पुढच्या पिढीला त्याहून सुंदर संस्कार देऊन जा. अशा प्रकारे पितृस्मरण हे केवळ भूतकाळाकडे पाहणे न राहता भूतकाळ वर्तमान भविष्य यांना जोडणारा संस्काराचा सेतू बनते. कृतज्ञ मी। कृतार्थ मी। पितृदेवताभ्यो नमः। भगवंत हृदयस्थ आहे.

## बोलीभाषा लेवा गणबोली साहित्यरत्न पुरस्कार माधुरी चौधरी यांना जाहीर

**ज्योतिर्मय साहित्य**

सुधीर कोर्टीकर..

अकोल येथील बोलीभाषा साहित्य संस्थेच्या वतीने देण्यात येणारा बोलीभाषा लेवा गणबोली



साहित्यरत्न पुरस्कार २०२६ फैजपूर येथील माहेरवाशीण माधुरी वाघूळदे -चौधरी यांना जाहीर करण्यात आलेला आहे.२२ नोव्हेंबर अमरावती येथे होणाऱ्या पहिल्या बोली भाषा साहित्य संमेलनात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.माधुरी चौधरी यांच्या लेवा गणबोलीतील साहित्य योगदानाची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आलेली आहे.माधुरी चौधरी यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्या बद्दल साहित्य क्षेत्रातील मान्यवर साहित्यिकांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले केलेले आहे.

## लता मंगेशकर यांच्या जयंतीनिमित्त ज्येष्ठ नागरिक कलावंतांची आदरांजली

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - भारतरत्न गानकोकिळा लता मंगेशकर यांच्या जयंतीनिमित्त पिंपळे सौदागर येथील अल्कोह सोसायटिच्या ज्येष्ठ नागरिक कलावंतांनी हिंदी चित्रपटातील सदाबहार गाणी सादर करीत दिदिंना आदरांजली अर्पण केली. सोमवार दि. २८ रोजी सायंकाळी सात ते नऊ या दरम्यान योगा गार्डन मध्ये झालेल्या या कार्यक्रमात बाबासाहेब काळे, रमेश दुसाने, सुरेश तांबोळी, सुरेश बिरारी, रमेश चांडगे आणि खत्री यांनी लतादिदि तसेच किशोरकुमार,



महंमद रफी, हेमंतकुमार, मुकेश, जगजीत सिंग, भूपेंद्र यांच्या आवाजातील मनाला भूरळ घालणारी ‘‘ याद आ रही है, ‘‘ ‘‘ ये नयन डरे डरे, ‘‘ होठोंसे छु लू तो, ‘‘ जाने कहा गये वो दिन, ‘‘ वो जब याद आये बहूत याद आये, ‘‘ ‘‘ पुकारता चला हू मैं, ‘‘ फुलों की रंग से दिल की कलम से, ‘‘ ‘‘ कही दूर जब दिन ढल जाए, ‘‘ ‘‘ ये मेरे वतन के लोगो ‘‘ ही काही सादर करुन लतादिदिंच्या गीत - संगीतमय स्मृतींना उजाळा दिला. एकुणच भारतीय चित्रपटसृष्टीतील संगीतक्षेत्रात लतादिदिंनी जे अमुल्य आणि अतुल्य असे योगदान दिलेले आहे त्या कर्तृत्वाच्या सन्मानार्थ गीतांच्या माध्यमातून आदरभाव व्यक्त करण्याचा हा एक अल्पसा प्रयत्न असल्याची भावना यावेळी या ज्येष्ठ नागरिक कलावंतांनी बोलून दाखवली.

## अभिज्ञान, पुणे आयोजित ‘मन’ आणि भारतीय विचार विषयावर ऑनलाइन व्याख्यान

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - अभिज्ञान, पुणे यांच्या वतीने ‘मन’ आणि भारतीय विचार या विषयावर विशेष ऑनलाइन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता हे व्याख्यान ऑनलाइन माध्यमातून होणार आहे.

या व्याख्यानासाठी विद्यावाचस्पती चन्द्रहास शास्त्री सोनपेठकर मार्गदर्शन करणार आहेत. भारतीय तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, संस्कृतसाहित्य, ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र आणि भारतीय ज्ञान परंपरेचे अभ्यासक म्हणून त्यांचा परिचय आहे.

भारतीय विचारपरंपरेतील मनाचे स्वरूप, मनाचा विचार आणि मानवी जीवनातील त्याचे महत्त्व या विषयांचा या व्याख्यानातून वेध घेतला जाणार आहे. भारतीय तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून ‘मन’ या संकल्पनेचा अभ्यास करण्याची संधी श्रोत्यांना मिळणार आहे.

व्याख्यानासाठी प्रवेश निःशुल्क असून जागा मर्यादित आहेत. सहभागी होण्यासाठी गुगल फॉर्मद्वारे पूर्वनोंदणी आवश्यक आहे. नोंदणीची लिंक : https://forms.gle/jFmAndefzMEk82m67

नोंदणी केलेल्या सहभागींच्या ई-मेलवर व्याख्यानाची ऑनलाइन लिंक पाठविण्यात येईल. अधिक माहितीसाठी व्हाट्सअॅप क्रमांक ७२४९१२२४२८ / ९८५००७४४१८ वर संपर्क साधावा, असे आयोजकांनी कळविले आहे.




## मायबोली निवासी कर्ण-बधिर विद्यालय येवलाच्या वतीने धोंडीरामसिंह राजपूत यांचा सन्मान

**ज्योतिर्मय साहित्य**

वैजापूर - येथील बालसाहित्यिक व लेखक धोंडीरामसिंह राजपूत यांनी येवला येथील समता प्रतिष्ठाण संचलित मायबोली निवासी कर्ण-बधिर विद्यालयातिल विद्यार्थ्यांना कविता कशी लिहावी?,कविता रचना करतांना यमक कसे साधावे?बालकविता रचना कशा कराव्या? या विषयी मार्गदर्शन केले होते तसेच या विद्यालयातील मूक -बधिर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यांचे भान ठेवत येथील या शाळेचे अध्यक्ष व समता प्रतिष्ठाणचे अध्यक्ष अर्जुन कोकाटे यांनी राजपूत यांना स्मृती चिन्ह,नेपकीन व गुलाब पुष्प देऊन सन्मानित केले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष अन्न पुरवठा मंत्री ना.छगनराव भुजबळ होते तर प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार मारोतराव पवार, तसेच माजी आमदार व लेखक लहू कानडे,नगराध्यक्ष राजेंद्र लोणारी ,सामाजिक कार्यकर्त्या मंगला खिंवसरा यांची प्रमुख उपस्थिती होती.




## स्वातंत्र्यलढ्यातील तेजस्वी तारा - गंगाधरराव देशपांडे

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून) बेळगावमध्ये अधिवेशन भरविण्यामागे देशपांडे यांचा मोठा वाटा होता. काकीनाडा अधिवेशनाच्या वेळी देशपांडे आणि त्यांच्या सहका-यांनी पुढील अधिवेशन बेळगाव येथे घेण्याची मागणी केली. मंगळूर, धारवाड, म्हैसूर यांसारख्या शहरांपेक्षा बेळगावची निवड व्हावी यासाठी त्यांनी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांना पटवून दिले. अधिवेशनाच्या स्वागत समितीचे अध्यक्ष म्हणून देशपांड्यावर प्रचंड जबाबदारी होती. हजारो प्रतिनिधी आणि पाहुण्यांसाठी निवास, भोजन, पाणी, आरोग्य, स्वच्छता, सुरक्षा, वाहतूक आणि सभेची व्यवस्था करावी लागली. या कामासाठी सुमारे दहा महिने त्यांनी अथक परिश्रम घेतले. अधिवेशनासाठी ‘‘विजयनगर‘‘ नावाची तात्पुरती वसाहत उभारण्यात आली. खादी आणि बांबूच्या झोपड्या, तात्पुरते रुग्णालय, स्वयंपाकघर, विहीर, स्वयंसेवकांची व्यवस्था आणि सभेसाठी मोठे मंडप उभारण्यात आले. महात्मा गांधींनी या अधिवेशनाच्या भाषणात कठी सूत कातणे आणि असहकार चळवळीचा समावेश होता. या अधिवेशनाला ७०,००० लोक उपस्थित होते. १९२४ च्या अधिवेशनाच्या स्थळाला विजयनगर असे नाव देण्यात आले. देशपांडे यांनी हिशोब ठेवला. अधिवेशनाचा खर्च २,२०, ८२९ रुपये आणि पाच आणे सहा पैसे होता. त्याच ठिकाणी विजयनगर वीर सौध उद्यान नावाचे एक उद्यान निर्माण करण्यात आले आहे. ज्या भागाला टिळकवाडी असे म्हंटले जाते. या उद्यानात गांधींचा पुतळा आणि १९२४ च्या अधिवेशनाची अनेक छायाचित्रे आहेत. या अधिवेशनासाठी पंपा सरोवर या नावाने



खोदलेली विहिर पुढे काँग्रेस विहीर म्हणून प्रसिद्ध झाली. या विहीरीसाठी ४३७० रुपये आणि ३ आणा खर्च आला होता जी विहीर या उद्यानात आहे. पंडीत जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस, सरोजिनी नायडू, मोतीलाल नेहरू, सैफुद्दीन किचलू, अॅनी बेझंट, शौकत अली आणि आर.एच. कुलकर्णी हे देखील या प्रसंगी उपस्थित होते.

लाला लजपत राय यांच्याशी मैत्री असलेल्या गंगाधरराव देशपांडे यांनी च्या सुमारास हुदळी जवळ खादी केंद्र सुरू केले जे कर्नाटकातील पहिले खादी युनिट. खादी चळवळीबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी ते गावोगाव फिरले. देशपांडे यांच्या निमंत्रणावरून महात्मा गांधी १९३७ मध्ये गांधी सेवा संमेलनासाठी हुदलीला गेले आणि सात दिवस तिथे राहिले. या परिषदेत सरदार वल्लभभाई पटेल, सरोजिनी नायडू, राजेंद्र प्रसाद, अब्दुल गफार खान, महादेव देसाई, कस्तुरबा गांधी यांच्यासह १०,००० प्रतिनिधी उपस्थित होते. महात्मा गांधी हिंदीमध्ये बोलले आणि देशपांडे यांनी त्यांच्या भाषणाचे कन्नडमध्ये भाषांतर केले.

गंगाधरराव देशपांडे यांनी १८८४ मध्ये लक्ष्मीबाई यांच्याशी लग्न केले. त्यांना चार मुली होत्या. पत्नीचे निधन १९१२ साली झाले. त्यांनी १८९९ साली धुरीण, १९०७ साली राष्ट्रमत आणि १९२०




साली लोकमान्य ही वृत्तपत्रे चालू केली आणि स्वातंत्र्यलढ्यासाठी समाजप्रबोधन म्हणून चालविली. एवढेच नव्हे तर स्वदेशी डेक्कन भांडार, राष्ट्रीय वित्त व बँकीग निगम याची स्थापना केली. टिळकांचेच असहकाराचे राजकारण गांधी चालवीत आहेत असे त्यांचे मत होते. नागपुर काँग्रेसचा आदेश मानून त्यांनी राष्ट्रीय शाळा, टिळक फंड व स्वातंत्र्य चळवळ यांस वाहून घेतले आणि पुढे आपली बरीच संपत्ती सेवासंघाला दिली. टिळकांप्रमाणेच ब्रिटिश सरकारने देशपांडे यांना त्रास दिला. आणि त्यांची संपत्ती जप्त केली. काँग्रेसचे हंगामी अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. एक प्रभावी वक्ता म्हणून त्यांची ख्याती होती. कर्नाटकातील राजकारणावर देशपांडे यांची छाप होती व त्यांचा शब्द अखेरचा मानला जाई. गंगाधरराव देशपांडे यांचे लेखन मुख्यतः राजकीय स्वरूपाचे असले तरी शि.म. परांजपे यांच्या चरित्राला त्यांनी महत्वाची प्रस्तावना १९४५ साली लिहिली. देशपांडे यांचा अनुग्रह हा पत्रसंग्रह त्यांचे शिष्य व एक निकटवर्ती पुंडलीकजी कातगडे यांनी त्यांच्या मृत्यूनंतर १९६४ साली प्रकाशित केला. ३० जुलै १९६० रोजी गंगाधरराव देशपांडे यांचे वयाच्या ९० व्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले. माझी जीवनकथा हे त्यांचे आत्मचरित्र त्यांच्या मृत्यूनंतर प्रकाशित झाले. या आत्मचरित्राची सर्व मुद्रिते त्यांनी स्वतः पाहिली होती. स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी राजसंन्यास घेतला होता. फजल अली आयोगाने राज्यांच्या पुनर्रचनेदरम्यान देशपांडे यांचा सल्ला घेतला होता. कन्नड आणि संस्कृती विभाग, स्मार्ट सिटी, राणी चेन्नम्मा विद्यापीठ आणि इतर संस्था बेळगावमधील रामतीर्थ सिटी पार्क येथे गंगाधरराव देशपांडे स्मारक आणि संग्रहालय बांधणार आहेत. ज्यासाठी बेळगाव नागरी विकास प्राधिकरणाने १५ गुंढे जागा मंजूर केली आहे. स्वातंत्र्यलढ्यासाठी आपले अख्खे आयुष्य वेचणारे गंगाधरराव देशपांडे यांनी स्वातंत्र्यानंतरही शिक्षण प्रसार, अस्पृश्यता निर्मूलन आणि उपेक्षित समुदायांच्या हक्कांसाठीचा लढा यासाठी आपले जीवन अर्पण केले.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559